ISSN–2277- 8721

EIIRJ

ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

Volume–XI, Issue– III May – June 2022

Original Research Article

# विधवांच्या उन्नतीसाठी समाज सुधारकांचे योगदान

**प्रा. किरण सुरवसे**

श्री सिद्धीविनायक महिला महाविद्यालय, कर्वेनगर, पुणे ५२

ईमेल आयडी: surwasekiran7@gmail.com

**गोषवारा**

*१९ व्या शतकात भारतीय समाजात सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रात अनेक महत्त्वपूर्ण परिवर्तने घडून आली. याच काळात भारतीय समाजात स्त्रियांची स्थिती दयनीय होती. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नाकारण्यात आला. आर्थिक निर्णयापासून त्यांना वंचित ठेवले गेले. त्यांना समाजात व कुटुंबात कोणत्याही प्रकारची प्रतिष्ठा नव्हती. भारतीय समाजातील स्त्रिया या अस्पृश्यता, बालविवाह, जरठ बाला विवाह, सतीप्रथा, केशवपन, विधवा पुनर्विवाह बंदी, अकाली वैधव्य अशा अनिष्ठ रूढी व जाचक प्रथा-परंपराच्या विळख्यात अडकल्या गेल्या होत्या. थोडक्यात भारतीय समाजात स्त्रियांना गुलामगिरीचे आयुष्य जगावे लागत होते. इतर स्त्रियांच्या तुलनेत विधवा स्त्रियांची स्थिती अतिशय हलाखीची व दयनीय होती. फार मोठ्या प्रमाणात त्यांना शोषणाला बळी पडावे लागले. अशा गुलामगिरीत अडकलेल्या स्त्रियांना मुक्त करण्यासाठी व विशेषत: विधवांच्या उन्तीसाठी भारतातील समाज सुधारकांनी दिलेले योगदान अतिशय महत्त्वपूर्ण आहे.*

**बीज संज्ञा**: *विधवा, समाजसुधारक, पुरुषप्रधानता, विषमता*

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

## प्रस्तावना

भारतीय समाज हा पुरुषप्रधान देश आहे. या पुरुषप्रधान समाजात स्त्रियांना नेहमी अतिशूद्र लेखण्यात आले. त्यांच्यावर अनेक प्रकारचे अन्याय व अत्याचार करण्यात आले. प्रथा आणि परंपरा यांच्या नावाखाली स्त्रियांवर अनेक प्रकारची बंधने लादली गेली. भारतीय समाजात प्रचलित असलेल्या बालविवाह, जरठ बाला विवाह, सतीप्रथा, केशवपन अशा जाचक चालींमुळे विधवांना गुलामगिरीत विषमतापूर्ण जीवन जगावे लागत असे. विधवांच्या स्थितीत बदल घडवून आणण्यासाठी अनेक समाज सुधारकांनी प्रयत्न केले. म्हणून प्रस्तुत शोध निबंधात १९ व्या शतकातील विधवांच्या स्थितीवर प्रकाश टाकून विधवा स्त्रियांच्या उन्तीसाठी समाज सुधारकांनी दिलेल्या योगदानाचा विचार केला आहे.

## शोध निबंधाची उद्दिष्टे

प्रस्तुत शोध निबंधासाठी उद्दिष्टे खालील प्रमाणे –

१) १९ व्या शतकातील विधवांची स्थिती अभ्यासणे.

२) विधवांच्या कल्याणासाठी भारतीय समाज सुधारकांच्या योगदानाचा आढावा घेणे.

**शोध निबंधाची गृहीतके**

प्रस्तुत शोध निबंधासाठी गृहीतके खालील प्रमाणे -

१) १९ व्या शतकात विधवांची स्थिती अतिशय दयनीय होती.

२) भारतात विधवांच्या स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी अनेक समाज सुधारकांनी प्रयत्न केले.

**माहिती संकलनाचे स्त्रोत**

प्रस्तुत शोध निबंध लिहण्यासाठी माहिती संकलनाच्या दुय्यम स्त्रोतांचा वापर केला आहे. वर्तमान पत्रे, नियतकालिके, संदर्भ ग्रंथ, प्रकाशित व अप्रकाशित लेख, इंटरनेट इत्यादी साधनांचा वापर करून माहितीचे संकलन केले आहे.

**१९ व्या शतकातील विधवांची स्थिती**

भारतीय समाजात १९ व्या शतकात विधवा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन असामाजिक, अमानवी, विषमतापूर्ण व अत्यंत हीन प्रवृत्तीचा होता. त्यामुळे त्यांना अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागले.

**बालविवाह**

भारतीय समाजात १९ व्या शतकात अनेक अनिष्ट चालीरीतींपैकी बालविवाह ही एक पद्धत होती. वयात येण्यापूर्वी मुलगा किंवा मुलगी यांचा विवाह म्हणजे बालविवाह. भारतीय समाजात शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या परिपक्व होण्यापूर्वीच मुलगा आणि मुलगी यांचे विवाह केले जात असत. या काळात जरठ बाला विवाह, बालविधवांची समस्या, अकाली वैधव्य, अनौरस संततीचा प्रश्न, भ्रूणहत्या अशा अनेक समस्या या बालविवाहाशीच निगडित होत्या. लहान वयातच मुलींवर अकाली मातृत्व देखील लादले जात होते. ज्या वयात शिक्षण घ्यावयाचे, त्या वयात मुला – मुलींचे विवाह लावून दिले जात असत. भारतीय समाजात रुजू असलेल्या या बालविवाहाच्या पद्धतीमुळे दुर्दैवाने जर लहान वयातच मुलीला वैधव्य प्राप्त झाले तर तिला आयुष्यभर वैध्व्यातच जगावे लागत असे. बालवयातच विधवांच्या वाट्याला फक्त दुःख, निराशा व अवहेलनाच येत असे. १९ व्या शतकात समाजसुधारणेच्या ज्या चळवळी सुरु झाल्या त्यात बालविवाहाचा प्रश्न अतिशय तीव्रपणे चर्चिला गेला.

**जरठ बाला विवाह**

लहान मुलींच्या शारीरिक बौद्धिक, मानसिक विकासाच्या अभावामुळे विवाहानंतर बहुतांश वेळेला पहिल्या बाळंतपणातच त्यांचा दुर्दैवी मृत्यू होत असे. परिणामी भारतीय समाजात विधुर पुरुषांना पत्नीची गरज भासत असे. म्हणून १९ व्या शतकात भारतीय समाजात जरठ बाला विवाहाची पद्धत रूढ होती. बालिका म्हणजे लहान किंवा कुमारिका मुलगी आणि जरठ म्हणजे प्रौढ किंवा वृद्ध पुरुष आणि यांचा विवाह म्हणजे जरठ बाला विवाह होय. या पद्धतीमुळे लहान वयातच मुलींचे शारीरिक, मानसिक व लैंगिक शोषण होत असे. जरठ बाला विवाहासारख्या पद्धतीमुळे लहान मुलींचे व विधवांचे प्रश्न अधिकच गंभीर बनले.

**सतीप्रथा**

याच काळात भारतीय समाजात मानवतेला कलंक असणारी सतीप्रथा रूढ झाली. पतीच्या निधनानंतर त्याच्या पत्नीचे जगणे म्हणजे पाप मानले जात असे. अनेक प्रकारची सामाजिक, आर्थिक व धार्मिक बंधने स्त्रियांवर लादण्यात आली होती. पतीच्या निधनानंतर विधवा स्त्री मुळे समाजाचे संतुलन बिघडते म्हणून त्या विधवेला सती जाण्यास भाग पाडले जात असे. एखाद्या विधवेने सती जाण्यास नकार दिल्यास तिला बळजबरीने सती बनवून पाठविले जाई.

**वैधव्य लादणे**

पतीच्या निधनानंतर त्याच्या इतर स्त्रियांप्रमाणे जगण्याचे हक्क नाकारले गेले. विधवा स्त्रियांना पतीच्या निधनानंतर पुनर्विवाहाचा अधिकार नव्हता. विधवांनी चांगली वस्त्रे परिधान करू नये, चांगला आहार घेऊ नये, सामाजिक वावर टाळावा, डोक्यावरचे केस काढून टाकावे अर्थातच केशवपन करावे, कौटुंबिक, सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊ नये अशी जाचक बंधने त्यांच्यावर लादण्यात आली. केशवपन पद्धत विधवेला अतिशय कुरूप करून टाकण्यासाठी होती. कारण विधवा स्त्रिया जर चांगल्या राहिल्या तर त्यांच्याकडून अनैतिक वर्तन होण्यची शक्यता आहे त्यामुळे त्यांच्यावर निकृष्ट राहणीची बंधने लादण्यात आली. सक्तीने त्यांच्यावर वैधव्य लादण्यात आले.

**विधवा पुनर्विवाह बंदी**

१९ व्या शतकात भारतीय समाजात विधवांच्या पुनर्विवाहासाठी बंदी होती. त्यांच्यावर अकाली वैधव्य लादले जात होते. त्यांना कौटुंबिक धार्मिक कार्यात सहभाग घेण्यात मनाई होती. त्यांच्या खाण्या-पिण्यावारही बंधने लादण्यात आली होती. पुनर्विवाह बंदीमुळे विधवा स्त्रिया गुलामीचे जीवन जगत होत्या.

अशा प्रकारे भारतीय समाजात १९ व्या शतकात बालविवाह, जरठ बाला विवाह, सतीप्रथा, केशवपन, विधवा पुनर्विवाह बंदी, अकाली वैधव्य यांसारख्या जाचक प्रथांमुळे विधवा स्त्रियांचे जीवन अतिशय दयनीय बनले. यातूनच विधवा स्त्रियांच्या या शोषक, दयनीय स्थितीत परिवर्तन होऊन त्यांच्या स्थितीत सुधारणा घडवून आणण्याची नितांत आवश्यकता निर्माण झाली. परिणामी भारतीय समाजात अनेक समाज सुधारकांच्या प्रयत्नांमुळे विधवा स्त्रियांच्या स्थितीत महत्त्वपूर्ण सुधारणा घडून आल्या.

**विधवा स्त्रियांच्या उन्नतीसाठी समाज सुधारकांचे योगदान**

एकोणिसाव्या शतकात समाज सुधारणेच्या चळवळी सुरु झाल्या. बालविवाह, जरठ बाला विवाह, सतीप्रथा, केशवपन अशा अनिष्ट चालीरीतींमधून विधवांची मुक्तता होऊन त्यांना पुनर्विवाह करता यावा यासाठी राजा राममोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, केशवचंद्र सेन, जोतीबा फुले, धोंडो केशव कर्वे अशा अनेक समाज सुधारकांनी प्रयत्न केले.

**राजा राममोहन रॉय**

भारतीय समाजात पुरुष प्रधान संस्कृतीमुळे स्त्रियांचे स्थान कनिष्ठ होते. स्त्रियांना गुलामगिरीत जगावे लागत असे. त्याच बरोबर समाजात रूढ असलेल्या बहुपत्नीत्व या पद्धतीमुळे स्त्रियांवर अनेक तऱ्हेने अन्याय होत होता. अशा अन्यायी पद्धतीला राजा राममोहन रॉय यांनी विरोध करून स्त्री पुरुष समान हक्कांसाठी आणि स्त्री शिक्षणासाठी संघर्ष केला. भारतीय समाजात बालविवाह व जरठ बाला विवाह यांसारख्या जाचक पद्धतींमुळे बाल विधवांची समस्या तीव्र होती. अशा जाचक प्रथांमधून विधवांची मुक्तता होण्यासाठी व त्यांच्या पुनर्विवाहासाठी राजा राममोहन रॉय यांनी विशेष असे उल्लेखनीय कार्य करून स्त्री सुधारणा चळवळीचा पाया घातला. त्यांनी सतीच्या चालीचा उघडपणे विरोध केला. भारताचे गव्हर्नर जनरल लॉर्ड विलियम बेंटिकयांच्या सहाय्याने रॉय यांनी १८२९ मध्ये भारतातील सतीची चाल कायद्याने बंद केली..

**ईश्वरचंद्र विद्यासागर**

बंगालमधील एक श्रेष्ठ संस्कृत पंडित, लेखक व उदारमतवादी सुधारक म्हणून ईश्वरचंद्र विद्यासागर यांना ओळखले जाते. त्यांनी समाजातील अनिष्ट रुढी-परंपरा विरोधात आजीवन कार्य केले. विशेष करून त्यांनी विधवांच्या समस्येकडे आवर्जून लक्ष दिले. विधवा विवाहाचा कायदा करण्यात यावा यासाठी ९८७ लोकांच्या स्वाक्षरी असलेला अर्ज भारत शासनाकडे पाठविला. म्हणून १८५६ साली विधवा विवाहाचा अधिनियम संमत

करून घेण्यात ईश्वरचंद्र विद्यासागर यांचा अतिशय मोलाचा वाटा होता. त्यांनी १८५५ मध्ये 'विधवा विवाह' हा ग्रंथ लिहून विधवा पुनर्विवाहाचे समर्थन केले. आपल्या स्वतःच्या मुलाचा विवाह देखील त्यांनी बाल विधवेशी लावून दिला. यातूनच त्यांनी बाल विधवा विवाहाचा पुरस्कार केला. त्यांनी सोमप्रकाश नावाचे बंगाली साप्ताहिक काढून त्यात स्त्री शिक्षणाचा प्रसार केला तसेच बहुपत्नीत्व, बालविवाह अशा जाचक प्रथांवर कडाडून टीका केली.

**शशीपाद बॅनर्जी**

शशीपाद बॅनर्जी यांनी स्त्रियांच्या उन्नतीसाठी प्रयत्न केले. तसेच त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी देखील नेहमीच पुढाकार घेतला. १८८७ मध्ये त्यांनी विधवांसाठी विधवागृहाची स्थापना केली. विधवा पुनर्विवाहाचे त्यांनी जोरदार समर्थन केले. आपल्या विधवा पुतणीच्या विवाहासाठी देखील प्रयत्न केले. त्यांनी आपल्या स्वतःच्या घरी चाळीस विधवांचे पुनर्विवाह लावले. इतकेच नव्हे तर त्यांनी स्वतः देखील एका विधवा स्त्रीशी विवाह करून समाजाला एक आदर्श घालून दिला.

**केशवचंद्र सेन**

केशव चंद्र सेन यांनी स्त्रियांच्या दयनीय स्थितीत परिवर्तन घडवून आणण्यासाठी आणि त्यांच्या उन्नतीसाठी विशेष प्रयत्न केले. विशेष करून त्यांनी विधवा विवाहाचे समर्थन केले. संकटग्रस्त विधवांना त्यांनी आश्रय दिला आणि ब्राह्मो समाजाच्या सहाय्याने त्यांनी विधवांचे पुनर्विवाह घडवून आणले. बालविवाह, बहुपत्नीत्व, पडदा पद्धत अशा अनिष्ट जाचक पद्धतींचा त्यांनी कडाडून विरोध केला. त्यांनी बालविवाहाला विरोध करून १८७२ साली मुलींच्या विवाहाची वयोमर्यादा १४ वर्ष ठरविणारा 'द नेटीव्ह सिव्हील मॅरेज ॲक्ट' पास करून घेतला.

**डॉ. भाऊ दाजी लाड**

डॉ. भाऊ दाजी लाड यांनी स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा घडून आणण्यासाठी स्त्री-शिक्षणाला विशेष महत्त्व दिले. बाल विवाहामुळे स्त्रियांवर होणाऱ्या अन्याला अनुसरून विधवा पुनर्विवाहाला मान्यता मिळावी यासाठी त्यांनी समाजात जागृती करण्याचे कार्य केले.

**विष्णूशास्त्री पंडित**

विष्णूशास्त्री पंडित यांना स्त्रियांच्या उन्नतीची विशेष तळमळ होती. त्यांनी बालविवाह, पुनर्विवाह, केशवपन, जरठ बाला विवाह अशा अनेक प्रश्नांवर आपले विचार सडेतोडपणे मांडले. त्यांनी केवळ पुनर्विवाहाचा पुरस्कारच केला नाही स्वतः एका विधवेशी विवाह करून समाजापुढे एक आदर्श ठेवला. ‘इंदूप्रकाश’ या वृत्तपत्रातून त्यांनी विधवांच्या दुखांना वाचा फोडली. तसेच त्यांनी ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी लिहलेल्या 'विधवाविवाह' या ग्रंथाचे भाषांतर १८६४ मध्ये केले. कायमच त्यांनी विधवांच्या पुनर्विवाहाचे समर्थन केले. १८७० मध्ये पुणे येथे त्यांनी विधवा पुनर्विवाहविषयक वादात आपले विचार मांडले.

**गोपाळ हरी देशमुख ऊर्फ लोकहितवादी**

गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहितवादी यांनी बालविवाह, हुंडा, बहुपत्नीत्वाची पद्धती, अशा अनिष्ट प्रथांवर कडाडून टीका केली. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने अधिकार मिळाले पाहिजे, तसेच स्त्रियांना शिक्षण व विवाह या दोन्ही बाबींबाबत स्वातंत्र्य असावे आणि विधवांना पुनर्विवाह करण्याचा अधिकार असावा, असे विचार त्यांनी स्पष्टपणे मांडले होते. त्यांनी बालविवाहांना व विधवांच्या केशवपन करण्याच्या चालीला विरोध केला. ‘पुनर्विवाह’ या विषयावर त्यांनी अनेक निबंध लिहिले. व समाजाला प्रबोधन करण्याचे कार्य केले. समाजात प्रचलित असलेल्या बालविवाह, हुंडा, बहुपत्नीकत्व यांसारख्या अनिष्ट प्रथांवर त्यांनी आपल्या लेखनातून आणि भाषणांतून हल्ला चढविला.

ISSN–2277- 8721

EIIRJ

ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

Volume–XI, Issue– III May – June 2022

Original Research Article

**बाळशास्त्री जांभेकर**

बाळशास्त्री जांभेकर यांनी विधवा पुनर्विवाह, स्त्री-शिक्षण यांचा पुरस्कार केला. भारतीय समाजातील अनिष्ट व जाचक प्रथा बंद पडाव्यात किंवा किमान त्या प्रथांवर आळा तरी बसावा अशी त्यांची भूमिका होती. विधवा पुनर्विवाहाच्या समर्थनासाठी ते पुनर्विवाह चळवळीत सामील झाले.

**महात्मा जोतीबा फुले**

भारतीय समाजात स्त्री शिक्षण, बालविवाह, विधवा पुनर्विवाह, संमतीचे वय, यांसारख्या ज्वलंत विषयांवर सुधारक समाजाला जागृत करण्याचे प्रयत्न करू लागले. समाजात बालविधवा आणि तरूण विधवांची संख्या अधिक होती. वैधव्य आल्यानंतर विधवांचे केशवपन करण्याची चाल अनिवार्य होती. त्याशिवाय विधवा ही अपवित्र मानली जात होती. समाजाची आणि कुटुंबाची त्यांच्यावर करडी नजर असत. या बालविधवा व तरुण विधवांचा प्रश्न सोडविण्याकरिता पुनर्विवाहाची चळवळ अनेक समाज सुधारकांनी सुरू केली. या चळवळीला जोतीबा फुले यांचा सक्रिय पाठिंबा होता. महात्मा फुले यांनी १८६० मध्ये विधवाविवाहासाठी साहाय्य केले. त्यांनी बालविवाहाच्या प्रथेला प्रखर विरोध केला आणि १८६४ मध्ये पुण्यात एक पुनर्विवाह घडवून आणला. १८६५ मध्ये त्यांनी विधवांच्या केशवपन चालीविरुद्ध न्हाव्यांचा संप घडवून आणला. समाजात वासनेला बळी पडलेल्या तरुण विधवांची फार विटंबना होत होती. गर्भपाताचे होत असत असत. जन्मलेल्या बालकांची हत्याही होत असे. अशा विधवांना व बालकांना संरक्षण देण्यासाठी महात्मा फुले यांनी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. जोतीबा फुले यांनी काशीबाई नावाच्या विधवेचा मुलगा दत्तक म्हणून घेतला.

**महर्षी धोंडो केशव कर्वे**

महर्षी धोंडो केशव कर्वे ऊर्फ अण्णा कर्वे यांनी स्त्रियांचे शिक्षण, त्यांचे हक्क, विधवा-पुनर्विवाह यांसाठी आपले संपूर्ण जीवन वाहिले. स्त्रियांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी त्यांनी अविरत परिश्रम केले. प्रौढ वयात विधुर झालेल्या पुरुषाने अल्पवयीन मुलीशी विवाह करण्याची प्रथा अस्तित्वात होती. पण दुर्दैवाने पतीचे निधन लवकर झाल्यास त्या मुलीला मात्र त्याची विधवा म्हणून उर्वरित आयुष्य घालवावे लागत असे. ही समाज रीत कर्वे यांनी मोडून काढली. त्यांच्या पत्नी राधाबाई यांचे निधन झाल्यानंतर त्यांनी पंडिता रमाबाईंच्या शारदा सदन संस्थेत शिकणाऱ्या गोदूबाई उर्फ बाया कर्वे या विधवा मुलीशी पुनर्विवाह करून सामाजिक प्रथांविरुद्ध एक बंड त्यांनी केले. महर्षी कर्वे यांनी 'विधवा विवाह प्रतिबंध निवारक' मंडळाची स्थापना केली. बालविवाह, जरठ बाला विवाह, केशवपन यांसारख्या जाचक व अन्यायकारक रूढींत अडकलेल्या स्त्रियांना मोकळा श्वास मिळावा म्हणून त्यांनी १८९६ मध्ये सहा विधवा महिलांसह 'अनाथ बालिकाश्रम' स्थापन केले. त्यांनी विधवा विवाहाचा आग्रह धरून समाजाच्या मानसिकतेमध्ये बदल करण्यासाठी चळवळ उभी केली.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांच्या उद्धारासाठी व विकासासाठी त्यांनी स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराचा, गुलामगिरीचा, दास्यत्वाचा चिकित्सक पद्धतीने अभ्यास केला. त्यांनी जाती आणि स्त्रियांच्या प्रश्नांचा एकत्रित विचार केला आणि स्त्रियांच्या समस्यांचा संबंध जातीव्यवस्थेशी असल्याचे स्पष्ट केले. भारतीय समाजात बालविवाहाचे प्रमाण अधिक होते. जरठ बाला विवाह देखील मोठ्या संख्येने व्हायचे. पुरूषांना बहुविवाह करण्याची परवानगी होती. मात्र विधवांना पुनर्विवाह करण्याचा अधिकार नव्हता. पतीच्या निधनानंतर त्याच्या विधवेला त्याच्या संपत्तीपासून वंचित ठेवले जात असत. सतीप्रथेत मृत पतीच्या चीतेसोबत जाळले जात असत. आयुष्यभर वैध्व्यात स्त्रियांना जगावे लागत असे. विधवा स्त्रियांकडे आदराने पहिले जात नव्हते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू कोड बिलात सर्व सामान्य स्त्रियांबरोबर विधवा स्त्रियांना वारसा

ISSN–2277- 8721

EIIRJ

ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

Volume–XI, Issue– III May – June 2022

Original Research Article

हक्काने संपत्ती मिळविण्याचा अधिकार दिला. इतकेच नाही तर त्यांनी हिंदू कोड बिलात बहुपत्नीत्वाच्या पद्धतीला विरोध केला. त्यांनी भारतीय राज्यघटनेच्या तरतुदीत विधवांना अनेक मुलभूत हक्क आणि अधिकार प्रदान केले आणि त्यांना दास्यातून मुक्त केले.

**समारोप**

पुरुषप्रधान भारतीय समाजात विधवा स्त्रियांच्या दयनीय स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी अनेक समाज सुधारकांनी अत्यंत मोलाचे कार्य करून भारतातील विधवांच्या उन्नतीसाठी प्रयत्न केले. स्त्रीभ्रूण हत्या, बालविवाह, जरठ बाला विवाह, केशवपन, सतीप्रथा, अकाली वैधव्य अशा अनेक अनिष्ट चालीरीतींचा विरोध करून विधवांच्या पुनर्विवाहासाठी विशेष प्रयत्न केले. २१ व्या शतकात भारतीय समाजातील विधवांच्या स्थितीत अनेक प्रकारचे बदल झाले आहेत. व्यक्तीस्वातंत्र्य, मानवी हक्क, अनुकूल कायदे अशा अनेक बाबींमुळे विधवांचे प्रश्न काही अंशी मार्गी लागलेले दिसून येते.

**संदर्भ सूची**

१) वैद्य सुमन व कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास (१७५७-१८५७), श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर १९९८

२) कदम य. ना., समग्र भारताचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००३

३) पाटील पद्मजा व जाधव शोभना, भारतीय इतिहासातील स्त्रिया, फडके प्रकाशन, कोल्हापूर २००७

४) मोरे सदानंद, समाजसुधारक, सकाळ प्रकाशन

५) नाईकवाडे विशाल व साळवे मधुकर, समाजसुधारक व महाराष्ट्राचा समग्र इतिहास, ज्ञानदीप ऍकॅडमी

*Cite This Article:*

**प्रा. किरण सुरवसे,** *(2022)*. विधवांच्या उन्नतीसाठी समाज सुधारकांचे योगदान, ***Electronic International Interdisciplinary Research Journal***, *XI (III) May-June, 222-227.*